महाराष्ट्र विकास सेवा गट-ब मधील सहायक गट विकास अधिकारी (एस-१६) संवर्गातील अधिकाऱ्यांना गट विकास अधिकारी, गट-अ (एस-२०) संवर्गात तदर्थ पदोन्नती देणेबाबत. (निवडसूची वर्ष २०२४-२५)

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन आदेश क्रमांक : RDD-१३०११/१३६/२०२५/आस्था-३**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, मुंबई - ४०० ००१.
दिनांक: १५ सप्टेंबर, २०२५

**शासन आदेश :-**

निवडसुची वर्ष २०२४-२५ करिता महाराष्ट्र विकास सेवा, गट-ब मधील सहायक गट विकास अधिकारी या संवर्गातील (वेतन स्तर एस-१६ : ४४९००-१४२४००) खालील अधिकाऱ्यांना गट विकास अधिकारी या संवर्गातील (वेतन स्तर एस-२० : ५६१००-१७७५००) तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे

२. सामान्य प्रशासन विभाग एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या-१२, दिनांक १४.०७.२०२१ नुसार पदोन्नतीने नियुक्तीसाठी विहीत केलेल्या "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम, २०२१" मधील तरतूदींच्या अधीन नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी तसेच सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने सदर अधिकाऱ्यांना खालील तक्त्यातील त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे तदर्थ पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे:-

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव, सध्या धारण केलेले पद व ठिकाण | तदर्थ पदोन्नतीने पदस्थापनेचे पद व ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.सी.बोबडे, सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राजूरा, जि. चंद्रपूर | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोरपणा, जि. चंद्रपूर. | रिक्त पदी |
| २. | श्री. डी.आर. सोनकुसळे, सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहिल्यानगर, जि. अहिल्यानगर | गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर, जि. अहिल्यानगर. | रिक्त पदी |
| ३. | श्री. डी.एस. कदम, सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकर, जि. नांदेड | गट विकास अधिकारी, पंचायत समिती महागांव, जि. यवतमाळ. | रिक्त पदी |

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव, सध्या धारण केलेले पद व ठिकाण | तदर्थ पदोन्नतीने पदस्थापनेचे पद व ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|
| ४. | श्री.एस.आर.यमुलवाड, सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जि. लातूर | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर | रिक्त पदी |
| ५. | श्री. अजिंक्य कुंभार, सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिराळा, जि. सांगली | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, आटपाडी, जि. सांगली | रिक्त पदी |
| ६. | श्रीम. अर्चना टी. कोल्हे, सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, आंबेगाव, जि. पुणे | व्याख्याता, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, मांजरी फार्म, पुणे. | रिक्त पदी |
| ७. | श्री.अजित देसाई, सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबरनाथ, जि. ठाणे. | रिक्त पदी |
| ८. | श्री. सुभाष एल. सावंत, सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वाळवा, जि. सांगली | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, आजरा, जि. कोल्हापूर. | श्री. एस.ए. अकेले यांच्या जागी |
| ९. | श्री. एस.जी. पाटील, सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर, जि. लातूर | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, निलंगा, जि. लातूर. | रिक्त पदी |
| १०. | श्री. विजय यु. अहिरे, सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, एरंडोल, जि. जळगांव | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अक्कलकुवा, जि. नंदुरबार. | रिक्त पदी |
| ११. | श्री. एम.ई.कोमलवार, सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सावली, जि. चंद्रपूर | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सावली, जि. चंद्रपूर. | रिक्त पदी |
| १२. | श्री. उदय बी. जाधव, सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोर, जि. पुणे. | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू, जि. परभणी. | रिक्त पदी |

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव, सध्या धारण केलेले पद व ठिकाण | तदर्थ पदोन्नतीने पदस्थापनेचे पद व ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|
| १३. | श्री. अक्षय आर. भगत, सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर. | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नरखेड, जि. नागपूर. | रिक्त पदी |
| १४. | श्री. महेश एम. पांढरे, सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पनवेल, जि. रायगड | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, विक्रमगड, जि. पालघर. | रिक्त पदी |
| १५. | श्री. ए.पी. बांगर, सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शेवगांव, अहिल्यानगर. | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिंदखेडराजा, जि. बुलढाणा. | रिक्त पदी |
| १६. | श्रीम. पी.एन. लांडे, सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देऊळगांवराजा, जि. बुलढाणा. | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रिसोड, जि. वाशिम. | रिक्त पदी |
| १७. | श्री. महेश एस. बेहेकर, सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगणघाट, जि. वर्धा. | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मौदा, जि. नागपूर. | रिक्त पदी |

३. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१६ब यांच्या शासन निर्णय दि.०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णय प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून तदर्थ स्वरूपात पदोन्नती देण्यात येत आहे.

४. वरीलप्रमाणे अधिकाऱ्यांना गट विकास अधिकारी संवर्गात खालील अटींच्या अधीन राहून तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे :-

<u>अटी व शर्ती :-</u>

४.१) वरील अधिकाऱ्यांना देण्यात येणारी गट विकास अधिकारी संवर्गातील तदर्थ पदोन्नती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे .

४.२) प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ अधिकारी यांचे प्रत्यावर्तन झाल्यानंतर त्यांच्यासाठी संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास या आदेशातील कनिष्ठतम अधिकाऱ्यांना पदावनत करण्याच्या अधिन सदर तदर्थ पदोन्नत्या देण्यात येत आहेत.

४.३) सदर पदोन्नती प्रशासकीय निकड म्हणून लोकहितास्तव देण्यात येत आहे.

४.४) सदरची तदर्थ पदोन्नतीसाठी अकरा महिन्याच्या कालावधीसाठी असेल तसेच या तदर्थ पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

४.५) वरीलप्रमाणे अधिकाऱ्यांना पदोन्नतीने पदस्थापना दिलेल्या पदावर विहित कालावधीत रूजू होणे आवश्यक आहे .

५. संबंधित विभागीय आयुक्त/मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी गट विकास अधिकारी संवर्गात तात्पुरत्या पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेल्या वरील अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे आणि नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्याबाबत सूचना द्याव्यात.

६. संबंधित अधिकारी हे महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने), नियम, १९८१ च्या नियम १५ अन्वये विहित केलेल्या तरतूदीनुसार, पदग्रहण अवधी समाप्त होण्यापूर्वी पदोन्नतीने पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचे विरूद्ध शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितानी नोंद घ्यावी.

७. गट विकास अधिकारी संवर्गातील तदर्थ पदोन्नती दिलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन नियुक्तीच्या ठिकाणी रूजु झाल्यानंतर तसेच सदर पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर त्याचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा. संबंधित अधिकाऱ्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये. त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक : सीडीआर १०८२/२५६७/२८/अकरा, दिनांक ३०.८.१९८२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सूचना लक्षात घेऊन नियुक्ती रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

८. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक **२०२५०९१५१०५३०८३६२०** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DR.URMILA VAIBHAV JOSHI

Digitally signed by DR.URMILA VAIBHAV JOSHI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=0a6ce46aedb9acea34c72711d852d8e2e71e76603f9082ea9709649c6f45dc30, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=713D6BDDB988B05B1CC072EBFD3A58E7E640EA20499573AAE08DC106AC632ADD, cn=DR.URMILA VAIBHAV JOSHI
Date: 2025.09.15 12:30:06 +05'30'

**(डॉ.उर्मिला जोशी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा. मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव (ग्रा.वि. व पं.रा.)) यांचे स्वीय सहायक, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई,

४) विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व).
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
६) जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व
७) महालेखापाल - १/२ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई / नागपूर,
८) संबंधित अधिकारी (संबंधित विभागीय आयुक्त / मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांचेमार्फत.)
९) अवर सचिव (कार्यासन आस्था-२), ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.
१०) निवड नस्ती (कार्यासन आस्था-३), ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.